राजीनामा मंजूर करणेबाबत.
श्रीम.मोहिनी तुकाराम पांडुळे, कनिष्ठ सहाय्यक (लेखा)
गट-क, अर्थ विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
अर्थ विभाग
आदेश जा.क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/१८९/२०२५
अहिल्यानगर दिनांकः-२८/०५/२०२५

वाचा- १. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय जा.क्र.एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.-३३/ ९२/८ दिनांक ०२ डिसेंबर १९९७
२. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील नियुक्ती आदेश क्र. अर्थ/कार्या-१/आस्था-१/२२३/२०२४ दिनांक ३०/०७/२०२४
३. श्रीमती पांडुळे , कनिष्ठ सहा. (लेखा) यांचा राजीनामा अर्ज दिनांक २३/०५/२०२५
४. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांचेकडील आदेश जा.क्र.जिपनां/ मबावि/आस्था-२/१९०९/२०२४ दिनांक ११/१०/२०२४ व जा.क्र.जिपनां./मबावि/ आस्था-२/६८२/२०२५ दिनांक २२/०५/२०२५

ज्याअर्थी, श्रीम.मोहिनी तुकाराम पांडुळे, कनिष्ठ सहाय्यक (लेखा) गट-क,अर्थ विभाग, जि.प.अहिल्यानगर यांनी कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदाचा राजीनामा दिनांक २३/०५/२०२५ रोजीच्या अर्जान्वये संदर्भ क्रमांक ३ अन्वये मंजूरीस्तव या कार्यालयास सादर केलेला आहे.

ज्याअर्थी, श्रीम.मोहिनी तुकाराम पांडुळे, कनिष्ठ सहाय्यक (लेखा) गट-क,अर्थ विभाग, जि.प.अहिल्यानगर या इकडील संदर्भ क्रमांक २ मधील नियुक्ती आदेशा अन्वये कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदावर दिनांक ०१/०८/२०२४ रोजी अर्थ विभाग, जि.प.अहिल्यानगर येथे हजर झालेल्या आहेत.श्रीम.पांडुळे यांनी कनिष्ठ सहाय्यक (लेखा) गट-क या पदाचा राजीनामा दिनांक २३/०५/२०२५ रोजी दिला असून प्रस्तुत राजीनामा संदर्भ क्रमांक ४ अन्वये त्यांची नियुक्ती मुख्यसेविका/पर्यवेक्षिका या पदावर अन्य जिल्हा परिषदेमध्ये झाल्याने सादर केलेला आहे. संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आवश्यक ते प्रमाणपत्रे तसेच संदर्भ क्रमांक ३ अन्वये कार्यालय प्रमुखांनी श्रीम.पांडुळे यांचे एक महिन्याचे मुळ वेतन संबंधित लेखाशिर्षाखाली भरणा करुन चलनाची प्रत सादर केलेली आहे.

श्रीम.मोहिनी तुकाराम पांडुळे, कनिष्ठ सहाय्यक (लेखा) गट-क,अर्थ विभाग, जि.प.अहिल्यानगर, यांचेकडे कोणत्याही प्रकारचे शासकीय येणे प्रलंबित नसलेने व कोणत्याही प्रकारची चौकशी चालू अथवा प्रलंबित नसलेबाबतचा प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

त्याअर्थी, संदर्भ क्रमांक १ मधील शासन निर्णयातील तरतुदीनुसार व संदर्भ क्रमांक ३ च्या अर्जानुसार मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन श्रीम.मोहिनी तुकाराम पांडुळे, कनिष्ठ सहाय्यक (लेखा) गट-क या पदाच्या राजीनाम्यास मान्यता देत आहे.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२५०५२८०५००३३ असा आहे.

(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्रीम.मोहिनी तुकाराम पांडुळे, कनिष्ठ सहाय्यक (लेखा), अर्थ विभाग, जि.प.अहिल्यानगर.
व्दारा व प्रत- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर.

२/-सदर आदेशाची नोंद श्रीम.पांडुळे यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी. तसेच सदर आदेश श्रीम.पांडुळे यांना बजावून दिनांकीत स्वाक्षरीची प्रत दप्तरी दाखल करावी. प्रस्तुत बाबत श्रीम.पांडुळे यांचेकडे कोणत्याही प्रकारे थकबाकी / येणेबाकी नसल्याची खात्री करुन आदेशाची अंमलबजावणी करावी.

प्रत- मुळ नस्ती.